महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१५ वे | दिनांक : ३०/०७/२०२६ | वार : गुरूवार

# तुकाराम मुंढेंच्या कारवायांवर हायकोर्टाचे ताशेरे



**मुंबई :** दराज्यात गेल्या काही महिन्यांपासून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अन्न सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीसाठी मोठ्या प्रमाणावर धडक कारवाई सुरू केली आहे. पानटपऱ्यांपासून ते पंचतारांकित हॉटेलांपर्यंत अनेक आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. मात्र, या कारवाईच्या पद्धतीवरच आता मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. खासगी आस्थापनांवरच कठोर कारवाई करण्याऐवजी सरकारी आणि मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांचीही तपासणी करा, असे स्पष्ट निर्देश न्यायालयाने एफडीएला दिले आहेत.

नवी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलचा अन्न सुरक्षा परवाना रद्द करण्यात आल्याच्या निर्णयाला आव्हान देत संबंधित व्यवस्थापनाने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान एफडीएच्या कारवाईबाबत न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

एफडीएने पंचतारांकित हॉटेलच्या स्वयंपाकगृहात झुरळ आढळल्याच्या कारणावरून थेट अन्न परवाना रद्द केल्याबाबत न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. "परवा माझ्या डेस्कवर एक मोठे झुरळ दिसले, म्हणून मी न्यायालयाचे कामकाज बंद करायचे का?" असा उपरोधिक सवाल करत, एखाद-दुसरे झुरळ आढळल्याच्या आधारे थेट परवाना रद्द करणे योग्य ठरत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. कारवाई करताना दोषाचे गांभीर्य, परिस्थिती आणि त्यावरील सुधारणा यांचाही विचार होणे आवश्यक असल्याचे निरीक्षण खंडपीठाने नोंदवले.

एफडीएची कारवाई केवळ खासगी क्षेत्रापुरती मर्यादित राहिल्याबद्दलही न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. आजपर्यंत किती सरकारी कार्यालये, निमसरकारी संस्था किंवा मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांची तपासणी करण्यात आली? असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला. मंत्रालय, उच्च न्यायालय परिसर, सरकारी कँटीन, निमसरकारी संस्था तसेच मंत्र्यांच्या मालकीच्या आस्थापनांची तातडीने तपासणी करून त्याचा सविस्तर अहवाल न्यायालयात सादर करण्याचे निर्देश एफडीएला देण्यात आले आहेत. सुनावणीदरम्यान संबंधित पंचतारांकित हॉटेलमध्ये आवश्यक असलेल्या ७९ टक्क्यांच्या किमान निकषाच्या तुलनेत सुमारे ९५ टक्के स्वच्छता असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. त्यामुळे केवळ काही त्रुटींच्या आधारे परवाना रद्द करण्याचा निर्णय कितपत न्याय्य आहे, यावरही न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर हॉटेलला अंतरिम दिलासा देण्यात आला.

आस्थापनांवर कारवाई करताना तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचाही विचार केला गेला पाहिजे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षणही उच्च न्यायालयाने नोंदवले. नियमभंग झाल्यास कठोर कारवाई आवश्यक असली, तरी ती प्रमाणबद्ध आणि न्याय्य असावी, असा अप्रत्यक्ष संदेश न्यायालयाने दिला.

गेल्या काही महिन्यांत एफडीएने राज्यभरात हॉटेल, रेस्टॉरंट, डेअरी, क्लब आणि इतर खाद्य व्यवसायिकांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई केली आहे. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने केलेल्या निरीक्षणांमुळे एफडीएच्या कारवाईच्या निकषांवर आणि अंमलबजावणीच्या पद्धतीवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. सरकारी आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये समान निकषांवर तपासणी व्हावी, अशी अपेक्षा न्यायालयाने व्यक्त केल्याने या प्रकरणाकडे राज्यभराचे लक्ष लागले आहे.

# बसच्या स्मार्ट कार्डला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ



**मुंबई :** एसटी प्रवासात शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाला आता १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप NCMC स्मार्ट कार्ड प्राप्त झाले नसल्याने त्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्य शासनाच्या वतीने अमृत ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात येते. या सवलती अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी १ ऑगस्टपासून NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, राज्यातील अनेक पात्र प्रवाशांनी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असली तरी काही ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना अद्याप प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही. त्यामुळे केवळ कार्ड उपलब्ध न झाल्याने पात्र प्रवाशांना शासनाच्या सवलतीपासून वंचित राहावे लागू नये, याची दखल प्रताप सरनाईक यांनी घेतली आहे.

प्रताप सरनाईक म्हणाले, "एसटीची प्रवासी सवलत ही सर्वसामान्यांच्या सोयीसाठी आहे. तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक कारणामुळे कोणत्याही पात्र ज्येष्ठ नागरिक अथवा महिला प्रवाशाची गैरसोय होऊ नये, ही आमची भूमिका आहे. त्यामुळे NCMC स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्याच्या अंमलबजावणीला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे," असे सरनाईक यांनी सांगितले.

या मुदतवाढीमुळे NCMC स्मार्ट कार्ड अद्याप प्राप्त न झालेल्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, पात्र प्रवाशांनी या वाढीव मुदतीचा उपयोग करून NCMC स्मार्ट कार्डची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी, असे आवाहनही सरनाईक यांनी केले आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## गुरू महात्म्य अन् महिमा

गुरुवर श्रद्धा असावी
पण ,गुरु त अंधश्रध्दा नसावी..
गुरुवर विश्वास असावा.
पण,गुरू अविश्वसनीय नसावा.
गुरू, शीलवान असावा.
पण,गुरू आसाराम नसावा.
गुरू ,सज्जन असावा.
पण ,गुरू दुर्जन नसावा.
गुरू ,पंचशिली असावा.
पण ,गुरू दुश्शीली नसावा.
गुरूत करुणा अन् प्रज्ञा असावी,
पण मनात द्वेषभावना कधी नसावी.
गुरूत सत्याची निष्ठा असावी,
पण असत्याला साथ नसावी
गुरूत विनय अन् विवेक असावा,
पण दंभाचा लवलेश नसावा.
गुरूने समतेचा दीप उजळावा,
पण, भेदभावाचा द्वेषदीप हमेशा विझवावा
गुरू स्वतः आचरणी श्रेष्ठ असावा,
तेव्हाच शिष्यांचा तो खरा दैवत ठरावा
हल्लीचे ,भोंदू गुरू खरातीबाणा फसविती
राजकारणी दारी, सोबत नारी,कृतीत.अधर्म
पसरविती
ज्ञान देणारा तोच खरा गुरू
स्वार्थासाठी नव्हे, शिव -ज्योती शाहू सम झुरू
वेष नव्हे,द्वेष नव्हे, तो भीमराव
गुरु पदाला, जगात तेज लाभाव.
गुरूत,माँ जिजाऊ, सांवित्री, रमाई
आईची छाया असावी.
महात्म्य आणि महिमा या गुरूची
आज , गुरुपोर्णिमा खरी महिमा सर्वांनी गावावि...

- **(मधुबानंदा प्रधान,अकोला)**

*गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांना सार्थकी शुभेच्छा*

# ज्ञानेश्वर विद्यालय, बेगमपुरा येथे गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील बेगमपुरा भागातील ज्ञानेश्वर विद्यालयात आज, बुधवार (दि. २९ जुलै) रोजी गुरुपौर्णिमा उत्सव अत्यंत उत्साहात व मंगलमय वातावरणात संपन्न झाला.या भव्य कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका डॉ. संध्या मोरे यांच्या मार्गदर्शनात शाळेतील 'कैलासवासी पंढरीनाथ पाटील शिसोदे उर्फ भाऊ सभागृहात' करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वाती महाजन उपस्थित होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी तांगडे आणि अनिल काकडे यांनी स्थान भूषविले. तसेच प्रमुख वक्ते म्हणून कैलास वाघमारे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजनाने आणि स्वागत समारंभाने झाली.याप्रसंगी विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्य परंपरेवर आधारित विविध कथा सांगितल्या तसेच शिक्षणातील गुरूंचे अनन्यसाधारण महत्त्व आपल्या भाषणातून अतिशय सुंदर भाषेत विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवनी मिटकर या विद्यार्थिनीने केले व तिने आपले विद्यार्थी मनोगतही उत्तम प्रकारे मांडले.यावेळी प्रमुख वक्ते श्री.वाघमारे सर आणि श्री.काकडे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी अतिशय मनोरंजक पद्धतीने आणि सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना गुरु-शिष्यांचे नाते व त्याचे जीवनातील महत्त्व पटवून दिले, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी इशिता पवार या विद्यार्थिनीने सर्व उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. अतिशय आनंददायी वातावरणात या गुरुपौर्णिमा उत्सवाची सांगता झाली.


१२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc.
(Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903


# शिवाजी महाविद्यालयात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा जागर

**कन्नड : (प्रतिनिधी)** शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथील लोकप्रशासन विभागाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० वाजता तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.स्पर्धा दोन गटांत होणार असून माध्यमिक गट (इयत्ता ५ वी ते १० वी) साठी साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे वाचन व लेखन, ‘चिखलातील कमळ’ कथेतील भावार्थ, साहित्यातील महापुरुष, जीवनसंघर्ष व साहित्यसंपदा तसेच ‘फकिरा’ कादंबरीतील सामाजिक विचार हे विषय देण्यात आले आहेत. महाविद्यालयीन गट (इयत्ता ११ वी ते पदवी) साठी ‘जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव..!’, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अण्णा भाऊ साठे यांचे योगदान, साहित्यातील विद्रोही व्यक्तिरेखा, मानवतावादी मूल्ये आणि समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे विषय निश्चित करण्यात आले आहेत.स्पर्धेचे उद्घाटन श्रीमती सारिका भगत (तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी, कन्नड) यांच्या हस्ते होणार असून प्रमुख वक्ते म्हणून रविंद्र जोगदंड (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका) यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ. संजीवनी मानसिंह पवार या असतील.कार्यक्रमास महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्री अँड अॅग्रीकल्चरचे माजी अध्यक्ष मानसिंह पवार, संस्थेचे उपाध्यक्ष कृष्णा पाटील निकम, सचिव चंद्रकांत देशमुख, कोषाध्यक्ष बाळासाहेब मोहिते, डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यक्ष डॉ. आनंदराव महाले यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तसेच शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले, उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, श्री छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर आणि डॉ. भीमराव आंबेडकर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अभय आहेर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ उपविभागीय अधिकारी संतोष गोरड आणि कन्नड नगरपरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र लांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव चंद्रकांत देशमुख असतील. यावेळी उपाध्यक्ष कृष्णा पाटील निकम, डॉ. आनंदराव महाले, डॉ. बी. के. मगर, डॉ. राहुल क्षीरसागर व प्रा. अभय आहेर यांची उपस्थिती लाभणार आहे.लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे लोककलावंत, साहित्यिक आणि समाजप्रबोधनकार म्हणून महाराष्ट्राला सुपरिचित आहेत. त्यांच्या साहित्यामध्ये मानवतावादी मूल्यांचा प्रभावी संदेश आढळतो. विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्व कौशल्य विकसित करण्याबरोबरच अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांचा व साहित्याचा जागर घडवून आणणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.कन्नड तालुक्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांच्या प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांना या तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी करून घ्यावे, असे आवाहन लोकप्रशासन विभागाचे प्रा. डॉ. संजय भालेराव, प्रा. डॉ. सीमा काशीद तसेच स्पर्धेचे संयोजक व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले यांनी केले आहे

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## आनंदाने जगून पहावे

झाले गेले विसरून जावे
नवीन विचार करत रहावे
हाती असलेल्या क्षणांना
आनंदाने जगून पहावे. १

जी गोष्ट असाध्य आहे,
त्याचा विचार का करावे.
हाती असलेल्या गोष्टींनी
जीवनात आनंद भरावे. २

मागे जे काही घडून गेले,
ते ते सारे विसरून जावे.
संकटात दिसता कोणी
त्याला मदतीचा हात द्यावे. ३

सुख असो की दु:ख असो,
सदा सर्वदा आनंदी जगावे.
संकट कितीही येऊ दे सदा,
त्याला संधी म्हणून बघावे. ४

मित्रांनो हसत हसत जगताना,
सुख दु:खाशी हात मिळवावे.
संकट आलेच तर जीवनात,
सामर्थ्याने त्याला पळवावे. ५



**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, ३० जुलै रोजी परळी येथे समाधान शिबिर

**बीड (भगवंत पाळवदे) :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ३० जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मुक्ताई लॉन्स, इटके कॉर्नर, शासकीय विश्रामगृहाजवळ, परळी वैजनाथ येथे होणार आहे.या शिबिरास आमदार धनंजय मुंडे, मंत्री पंकजाताई मुंडे, बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे-जिरंगे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे, तहसीलदार विनोद रनवरे, तहसीलदार विलास तरंगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शिबिरामध्ये नागरिक, शेतकरी व विद्यार्थ्यांना विविध शासकीय योजनांची माहिती तसेच योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना दाखले, मंजुरीपत्रे तसेच आर्थिक धनादेशांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात येणार आहे. परळी विधानसभा मतदारसंघातील सर्व लाभार्थी, शेतकरी, नागरिक, विद्यार्थी व ग्रामस्थांनी या समाधान शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तहसील कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वाचनवेल प्रतिष्ठान तर्फे मराठी विभागाच्या कवितेच्या ग्रंथालयास ४० पुस्तके भेट



**कन्नड, : (प्रतिनिधी)** वाचन संस्कृती रुजविण्यासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या अहिल्यानगर येथील वाचनवेल प्रतिष्ठानच्या संचालिका रूपाली सोनवणे यांनी शिवाजी महाविद्यालय, कन्नड येथील मराठी विभागाच्या कवितेच्या ग्रंथालयासाठी ४० दर्जेदार कविता संग्रह भेट दिले.महाविद्यालयातील कवितेचे ग्रंथालय अधिक समृद्ध व्हावे आणि विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार काव्य पोहोचावे या उद्देशाने ही पुस्तके प्रदान करण्यात आली. या प्रसंगी वाचन संस्कृती, साहित्य प्रसार आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी वाढविण्याबाबत चर्चा झाली. भविष्यात तिफण वाचक चळवळ व वाचनवेल दोन्ही संस्थांनी एकत्रितपणे शैक्षणिक व साहित्यिक उपक्रम राबविण्याचेही ठरले. प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी वाचनवेलच्या उपक्रमाचे अभिनंदन केले.यावेळी महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शिवाजी हुसे आणि डॉ. रामचंद्र झाडे उपस्थित होते.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## श्रीकृष्ण महाविद्यालयात गुरुपौर्णिमेचा अभिनय उपक्रम



**गुंजोटी : (नागसेन कांबळे)** दरवर्षी गुरुपौर्णिमा येते आणि जाते सर्वजण एकत्र येऊन एखादा कार्यक्रम घेतला जातो आणि आपापल्या कामात रममान होतो. पण यावेळीच्या आणि यावर्षीच्या गुरुपौर्णिमेला श्रीकृष्ण महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांनी मिळून प्रत्येक शिक्षक जिथे असेल तिथे जाऊन अत्यंत आत्मियतेने व आदरातिथ्याने सन्मानपूर्वक त्याचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली व शुभेच्छा दिल्या. कुठलेही हार तुरे न घालता महाविद्यालयाच्या परिसरातील सुंदर सुंदर फुले एकत्र करून त्याचीच नयनरम्य गुच्छ तयार केले त्या गुच्छासोबत त्यांचा उत्साह आणि तत्परता अधिक चैतन्यदायी होती,महाविद्यालयाची कोणतीही दैनंदिन शिस्त न मोडता हा कार्यक्रम घडवून आणला. खरे तर गुरु पौर्णिमेला आपल्या जीवनात ज्यांच्याकडून आपण कळत नकळत काहीतरी शिकतो अशा सर्वांना वंदन करावयाचा हा दिवस .आपल्या विवेकाचा दीपक लावणाऱ्या, जीवनमूल्य आणि ज्ञानाचे बाळकडू पाजणाऱ्या सर्व गुरूंना वंदन करण्याची प्रथा अगदी प्राचीन काळापासून पूर्वापारपणे चालत आलेली आहे.

"गुरुर्ब्रह्म गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा:!! गुरुर साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरुवे नमः !! "ही परंपरा ओसाड बनत चाललेल्या महाविद्यालयीन जीवनात आणि वातावरणात एक नव संजीवन देणारी आहे कुमारी आकांक्षा म्हेत्रे, कुमारी गायत्री पालवे ,कुमारी अनुराधा पाटील, कुमारी स्वाती शिंदे, महेश मोरे ,नागेश सूर्यवंशी, समर्थ कुंभार, चैतन्य कट्टी, प्रतिक राठोड, गुंड्पा माशाळे आदी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मिळून या फिरत्या गुरुपौर्णिमेचे कृतज्ञपणे आयोजन केले.या अभिनव उपक्रमाने महाविद्यालयातील वातावरण भारावून गेले होते.

## गुरू

गुरू म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे नेणारी वाट,
ज्ञानाच्या दिव्याने उजळणारी प्रत्येक पहाट.

गुरू म्हणजे अक्षरांना अर्थ देणारा शिल्पकार,
सामान्य दगडातून घडवणारा तेजस्वी अवतार.

गुरू म्हणजे अनुभवांचा अथांग सागर,
चुकांमधून उभं राहायला शिकवणारा आधार.

गुरू म्हणजे पुस्तकातील शब्द नव्हे फक्त,
तर जगण्याला दिशा देणारा खरा सत्यवक्त.

गुरू स्वतः जळत राहून इतरांना प्रकाश देतो,
विद्यार्थ्यांच्या यशातच स्वतःचा आनंद शोधत राहतो.

नतमस्तक होतो त्या प्रत्येक गुरूपुढे,
ज्यांनी माणुसकीचे दिले आयुष्यभरसाठी धडे.

ज्ञान, विवेक, संस्कार आणि स्वाभिमान,
हीच गुरूंनी दिलेली अमूल्य ओळख,
आई वडील आणि गुरु हीच त्यातील नावे ठळक.

गुरूचे ऋण फेडणे अशक्यच असते,
कारण त्यांच्या शिकवणीमुळेच आयुष्य उजळत असते.



**- बाळासाहेब लिहिणार**






# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा कांता चॅरिटेबल ट्रस्टचा सेवाभावी उपक्रम



**मुरूम, (सुधीर पंचगल्ले)** कंटेकुर, तालुका उमरगा येथे कांता चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवारी (ता. २९) रोजी इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या बॅग व शालेय शिक्षणासाठी आवश्यक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले असून पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी ट्रस्टच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. हा उपक्रम कांता चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक धनराज जाधव, सचिव नूपुर जाधव यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. शिक्षण हा समाजाच्या प्रगतीचा पाया आहे, या विचारातून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेची बॅग तसेच शालेय शिक्षणासाठी आवश्यक साहित्य मोफत वितरित करण्यात आले. साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि उत्साह हा या उपक्रमाचे खरे यश ठरला. याप्रसंगी धनराज जाधव यांनी समाजसेवा ही केवळ मदत नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी असल्याचे सांगितले. शिक्षण, आरोग्य, शेतकरी सहाय्य, युवकांना प्रोत्साहन तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचे कार्य कांता चॅरिटेबल ट्रस्ट सातत्याने करत असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मोलाची मदत मिळाली असून समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक संदेशही पोहोचला. उपस्थितांनी कांता चॅरिटेबल ट्रस्टच्या या सेवाभावी कार्याचे कौतुक करत भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी सरपंच विजयाबाई जमादार, मुख्याध्यापक लक्ष्मीकांत पटणे, जीवन सूर्यवंशी, चित्ररेखा दंडे, लक्ष्मीबाई शिकारे, लतिफ लदाफ, लक्ष्मण येवते, विजयकुमार कलशेट्टी, शालेय व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष राजश्री निंबर्गे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कमलाकर पांचाळ, उपाध्यक्ष राम मुडगे, केंद्रप्रमुख बबिता महानुर, पोलीस पाटील लक्ष्मण पांचाळ, श्रीहरी पाटील, आशा सेविका लक्ष्मी घोडके, शकुंतला जमादार, महादेव बिराजदार, बालाजी जमादार, बालाजी जाधव, रसुल मुजावर, आप्पाराव पाटील, बसवेश्वर निंबर्गे, लक्ष्मण निंबर्गे, मुरळीचे माजी सरपंच इमरान पटेल, तंटामुक्ती समितीचे उपाध्यक्ष मुबारक मोजणीदार, मुस्ताक जमादार, इस्माईल पटेल, हसन मोजणीदार, राजेंद्र मुरलीकर, दीपक बिराजदार, बबलू पटेल, संभाजी कलबुर्गे, विश्वंभर सुरवसे, भरत जाधव, पुरुषोत्तम पिंपळे, पमू एकुरगे, शाम चौधरी, देवप्पा भाले, बबलू माने, दत्तात्रय प्रधाने तसेच शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. फोटो ओळ : कंटेकुर, ता. उमरगा येथील जिल्हा परिषद शाळेत कांता चॅरिटेबल ट्रस्टकडून धनराज जाधव, नूपुर जाधव यांच्याकडून विद्यार्थ्यांना बॅग व शालेय साहित्य वाटप करताना मान्यवर व अन्य.

# गुरु आज्ञा जीवनात आत्मसात केली तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश उजळेल - प्राचार्या कौशल्या सोमासे

**चापानेर** : येथील श्रीमती कस्तुरबा इंग्लिश स्कूल, चापानेर येथे भारतीय संस्कृतीतील गुरु-शिष्य परंपरेचा गौरव करणारा गुरुपौर्णिमा महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तिमय आणि संस्कारमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी गुरुंच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करत विचार, कविता, निबंध, मनोगते सादर केली. तसेच स्वतःच्या हस्ते तयार केलेली आकर्षक ग्रीटिंग कार्ड शिक्षकांना भेट देत गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व गुरुंच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी गुरुंचे महत्त्व सांगणारे प्रेरणादायी विचार, कविता आणि निबंध सादर केले. "गुरु म्हणजे ज्ञानाचा अखंड दीप", "गुरु म्हणजे जीवनाला योग्य दिशा देणारा मार्गदर्शक" अशा भावना विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केल्या. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या मनोगतांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्या कौशल्या सोमासे म्हणाल्या, "गुरु आज्ञा जीवनात आत्मसात केली तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश उजळेल. गुरु हे केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा, संस्कार आणि मूल्यांची शिकवण देतात. गुरुंचा आदर, शिस्त, परिश्रम आणि प्रामाणिकपणा या गुणांचा स्वीकार करणारा विद्यार्थी जीवनात निश्चितच यशस्वी होतो." त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये गुरुंबद्दल आदर, कृतज्ञता निर्माण झाला.विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आपल्या भावना व्यक्त करत हस्तनिर्मित शुभेच्छापत्रे अर्पण केली. या उपक्रमामुळे शिक्षकही भावूक झाले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देतानाच त्यांच्यामध्ये गुरुंबद्दल आदर, प्रेम आणि कृतज्ञतेची भावना दृढ करण्याचा उद्देश या कार्यक्रमातून साध्य झाला.यावेळी संस्थाध्यक्ष श्री. दशरथ सोमासे तसेच संचालक केतन पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत गुरुंच्या मार्गदर्शनाखाली ज्ञान, संस्कारची जपणूक करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या कौशल्या सोमासे यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप वाकडे, वर्षा जाधव, सुषमा मगर, दुर्गा वैष्णव, दिव्या लोखंडे, भारती पवार, शामबाला पवार, पूजा तोडावत, ममता कोल्हे, चंदा घुले या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच अंकुश राठोड, कविता हिरे आणि राजू राठोड या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा, संस्कारांची जपणूक करणारा आणि भारतीय गुरु-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा हा गुरुपौर्णिमा सोहळा विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमामुळे संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय, प्रेरणादायी आणि संस्कारमय वातावरणाने भारावून गेला.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६

# विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये ज्ञान व कौशल्य अवगत केल्यास निश्चितच यश प्राप्ती.. उद्योजक श्री. आशिष मंत्री.




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे)** विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये ज्ञान व कौशल्य अवगत केल्यास निश्चितच यश प्राप्ती होते असे प्रतिपादन जेईएस महाविद्यालय जालना येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ प्रसंगी उद्योजक आशिष मंत्री यांनी केले. जेईएस महाविद्यालय जालना येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नीट, जेईई, व एमएच -सीइटी मध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जेईएस शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री. श्रीनिवास भक्कड होते. विशेष प्रमुख अतिथी म्हणून मराठवाड्यातील यशस्वी उद्योजक श्री आशिष मंत्री होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ.गणेश अग्निहोत्री उपप्राचार्य डॉ. सुमंत बिक्कड पर्यवेक्षक प्रा. ज्ञानेश्वर धनवे, डॉ. फुलचंद मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभाची सुरुवात सरस्वती पूजन व दीप प्रज्वलित करून करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य -विद्यार्थी व पालक संवादही झाला. यावेळी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की," जेईएस महाविद्यालय मराठवाड्यातील सर्वात जुने महाविद्यालय असून ६८ वर्षांची निकालाची उज्वल परंपरा आहे. महाविद्यालयात सुसज्ज प्रयोगशाळा व भव्य ग्रंथालय तसेच क्रीडांगणही आहे. विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक ही कार्यक्रम होत असतात. ८० हजाराहून अधिक विद्यार्थी महाविद्यालयातून यशस्वी झाल्याचेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी २५ पेटंट निर्माण केलेले आहेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांमध्ये संशोधन कार्यही केलेले आहे. स्मार्ट क्लासरूम असून विद्यार्थ्यांनी या सोयी सुविधांचा लाभ घ्यावा. असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उद्योजक आशिष मंत्री म्हणाले की जगामध्ये ५५० मोठ्या कंपन्या असून जवळपास ३५० कंपना चालवणारे भारतीय आहेत. विद्यार्थ्यांनी कठीण कठीण परिश्रम करून अभ्यास केल्यास व त्यासोबत ज्ञान - कौशल्य आत्मसात करून ते अवगत केल्यास निश्चितच यश प्राप्ती होते. चीनमधील युवकांनी केलेली प्रगती उल्लेखनीय असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. १९८० पर्यंत चीन भारता एवढाच प्रगतिशील होता परंतु आता चीनने संपूर्ण जगात उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याचे त्यांनी सांगितले. मेहनत व कठोर परिश्रम यांच्या बळावर भारतीय विद्यार्थी संपूर्ण विश्वात नावलौकिक मिळवू शकतात, असेही श्री.मंत्री यांनी सांगितले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना श्री पुरुषोत्तम बगडिया म्हणाले की विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या सोयी सुविधांचा फायदा घ्यावा गुणवंत व्हावे, यशवंत व्हावे, महाविद्यालयाला नावलौकिक प्राप्त करून द्यावा ,अशीच उज्वल यशाची परंपरा कायम ठेवावी असेही श्री. बगडिया यांनी सांगितले. यावेळी नीट ,जेईई ,एमएच-सीईटी परीक्षांमध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या ५०, गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. एम जी सोनी, डॉ. अरविंद महाजन ,डॉ. स्वप्नील सारडा, प्रा. शिवनारायण ताठे, प्रा. सुग्रीव वासरे, प्रा. चौरे , प्रा. शिंदे, प्रा. अंबरवाडीकर, प्रा. संतोष मुंदडा, प्रा. जगदीश मुळे,प्रा. शंकर माने,आदींनी विशेष परिश्रम घेतलेत. समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब वाघ यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. गजानन बावस्कर यांनी मानलेत.

# मूल्यांवरील निष्ठा आणि कष्टाची तयारी असल्यास कोणीही यशस्वी होऊ शकतात: मनपा आयुक्त अमोल येडगे मौलाना आझाद महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ




**छत्रपती संभाजीनगर :** यशाच्या मार्गात अडथळे फार असतात. तुम्हाला काही मिळवायचे असेल तर मेहनत घ्यावी लागेल आणि स्वतःवर विश्वास ठेवावा लागेल. शिस्त, वेळेचे व्यवस्थापन आणि कष्टाच्या बळावर तुम्ही हवे ते प्राप्त करू शकता. असे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे आयुक्त अमोल येडगे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले. मौलाना आझाद महाविद्यालयात बुधवार (दि. 29) रोजी गुरू पौर्णिमेचे औचित्य साधत पदवी वितरण समारंभ उत्साहात पार पडला. या समारंभास छत्रपती संभाजीनगर मनपा आयुक्त अमोल येडगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हा कार्यक्रम मौलाना आझाद शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष मा. फरहत जमाल यांच्या अध्यक्षतेखाली महाविद्यालयाच्या सेमिनार हा◌ॅलमध्ये 11 वाजेला सुरू झाला.

यावेळी काळे उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक अंकित काळे, एम. डी. पाटील व्हेंचरचे संचालक अनिकेत पाटील, प्राचार्य डॉ. मजहर अहमद फारुकी, उपप्राचार्य डॉ. आरिफ पठाण, डॉ. सादिक अली, डॉ. इमरान उल्लाह कादरी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

पुढे येडगे म्हणाले, नोकरी मिळणे हे यशस्वी होण्याचे परिमाण नाही. आपली मूल्ये जपणे, स्वतःप्रती प्रामाणिक राहत आणि अडथळ्यांना पार करत आनंदी जीवन जगणे; हे यशस्वी होणे आहे. जीवनात खूप काही मिळविता येऊ शकते. त्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवून मेहनत केली पाहिजे. मोठमोठी स्वप्ने पहा, मोठे ध्येय समोर ठेवा आणि ते प्राप्त करण्यासाठी कष्ट करा, तुम्ही यशस्वी व्हाल. असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. काळे उद्योग समुहाचे संचालक अंकित काळे मनोगत व्यक्त करताना म्हणाले, विद्यार्थ्यांनी स्वतःला सतत अद्ययावत केले पाहिजे. शिक्षण हे निव्वळ पैसा, नोकरी यासाठीच नसून तणावविरहित आणि समाधानी जीवनासाठीही आवश्यक आहे. आपल्या शिक्षणाचा उपयोग समाज उत्थानासाठी करायला हवा. विद्यार्थांनी सजग नागरिक बनून देशहित जपले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपात मा. फरहात जमाल यांनी पदवीधरांना शुभेच्छा देत पालकांचा त्याग आणि आपली मूल्ये न विसरण्याचे आवाहन केले.

मा. फरहत जमाल, मा. अंकित काळे, मा. अनिकेत पाटील आणि प्राचार्य डॉ. मजहर अहमद फारुकी यांच्या हस्ते 69 विद्यार्थ्यांना पदवी वितरित करण्यात आली. या सोहळ्याला महाविद्यालयात सर्व प्राध्यापकवृंद, पदवीप्राप्त विद्यार्थी आणि त्यांचे कुटुंबीय मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

आभार प्रदर्शन डॉ. अश्फाक शेख यांनी तर सूत्रसंचालन डॉ. अपर्णा सराफ यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## भीमराव परमेश्वर वाघमारे यांना अर्थशास्त्र विषयात पदवी प्रदान



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातील संशोधक भीमराव परमेश्वर वाघमारे यांना अर्थशास्त्र विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. डॉ. भीमराव वाघमारे यांनी 'कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना : मराठवाड्यातील अनुसूचित जातींच्या आर्थिक व सामाजिक विकासातील योगदान' या विषयावर सखोल संशोधन करून अर्थशास्त्र शाखेत विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी संपादन केली. त्यांच्या संशोधनातून अनुसूचित जातींच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकण्यात आला आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून कुटुंबीयांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. त्यांचे यशस्वी वाटचालीत आई-वडिल सुखमल परमेश्वर वाघमारे, आनंद वाघमारे, उषा सुरेश समुद्रे, मनीषा गौतम रुपवते, गौतम रुपवते तसेच अक्षय जाधव, पँथर रिपब्लिकन विद्यार्थी आघाडीचे नेते गुणरत्न सोनवणे, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे आक्रमक खान, अमरदिप हिवराळे, संदिप तुपसमिंद्रे तसेच मित्रपरिवार, संशोधक, प्राध्यापक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## ओहर जि. प. कें. प्रा. शाळेत लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला उपक्रम



**छत्रपती संभाजीनगर : (प्रतिनिधी)** छत्रपती संभाजीनगर जवळील ओहरच्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत नुकतेच बालभारतीच्या पाठ्यपुस्तकातील इयत्ता चौथी मधील " कौतुकाची थाप" या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी ओहरच्या शाळेत गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर नुकतेच ओहरच्या जि. प. शाळेत विद्यार्थ्यांशी पाठाविषयी सविस्तर पार्श्वभूमी आणि प्रत्यक्ष प्रभावी अध्यापन करून दाखविली आहे. यावेळी विद्यार्थी हे प्रत्यक्ष लेखकाला पाहून भारावून गेले होते. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आनंद होता. विद्यार्थ्यांनी दिलखुलासपणे " कौतुकाची थाप " या पाठावर चर्चा केली आणि लेखकाशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले त्या प्रश्नांना लेखकांनी समर्पक असे उत्तर दिले. प्रत्यक्ष लेखकाला पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर विशेष आनंद दिसत होता. त्यामुळे सर्व विद्यार्थी हे आनंदीत दिसत होते. याप्रसंगी ओहर केंद्राचे केंद्रप्रमुख बळीराम सूर्यवंशी शाळेचे मुख्याध्यापक एकनाथ जाधव, शेख मोहसीन आणि कवी तथा उपक्रमशिल शिक्षक मनोज खुटेसर तसेच शिक्षका श्रीमती तरटेमॅडम, धनावतमॅडम, सपकाळमॅडम, शेखमॅडम आणि सर्व विद्यार्थी हे लेखकांच्या भेटीच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

प्रवेश सुरू

- बी.ए. मराठी व उर्दु
- एम.ए.
- एम.कॉम.
- बी.लिब.
- एम.लिब.
- DMLT
- फिजीओथेरपी
- रेडीओलॉजी
- OT टेक्नीशीएन
- MSW
- M.B.A.
- ECG X-Ray
- डिप्लोमा ऑप्थोमेट्री
- इलेक्ट्रीशिएन
- BEMS
- नर्सिंग
- डी.फार्मसी
- ECG टेक्नीशीएन

४ थी पास ते १२ वी नापास यांना सहा महिन्यात १२ वी पास (पूर्वतयारी)

* संपर्क *
प्राचार्य डॉ. हसन इनामदार - 9405109103 / 8830838903


## पौर्णिमेनिमित्त राष्ट्रमाता इंदिरागांधी सैनिकी शाळेत भव्य वृक्षरोपण



**खुलताबाद (जावेद अहेमद) :** श्री गजानन शिक्षण संस्था रायपूर डोणगाव राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा व ग्रीन गोल्ड आणि महाराष्ट्र पर्यटन प्रादेशिक विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा, रायपूर डोणगाव या ठिकाणी गुरुपौर्णिमे निमित्त भव्य वृक्षरोपण व गुरुपूजन करण्यात आले. या प्रसंगी २५०० झाडांचे रोपण यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी ग्रीन गोड कंपनीचे भाऊसाहेब तुपे पाटील, शिवाजी पवार पाटील, इंदिरा गांधी सैनिकी शाळेचे कमांडर संजय सोनवणे व महाराष्ट्र राज्य पर्यटन विभाग प्रादेशिक कार्यालयाचे पर्यटन सहाय्यक डॉ.शिवाजी गायकवाड, मुख्याध्यापक डॉ. निखिल राठोड उपमुख्यध्यापक दत्ता पडघन, डॉ. सोळंकीसर व संयोजन समितीचे जयभारत दुधमोगरे यांची यप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाविद्यालय परिसरात प्रति विद्यार्थी २५०० झाडांचे खड्डे खोदून रोपण करण्यात आले व गुरुपौर्णिमेचा उत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. या वृक्ष दिंडीच्या माध्यमातून परिसरामध्ये झाडे लावा झाडे जगवा वसुंधरा आपली पृथ्वी, आपली जबाबदारी असा संदेश या माध्यमातून देण्यात आला महाविद्यालय परिसरातील विद्यार्थी नागरिक शिक्षक प्राध्यापक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## स्वामी मच्छिंद्रनाथ मंदिरात गडकरी कुटुंबीयांचे गुरुपूजन






**दौलताबाद (जावेद अहेमद) :** श्री स्वामी मच्छिंद्रनाथ मंदिरात गुरुपौर्णिमा उत्सव सकाळी सात वाजता वेदांत रत्नपारखी यांच्या हस्ते प.पू. सद्गुरूस्वामी श्री माच्छिंद्रनाथ यांचे पूजन व गुरुपौर्णिमेचे हवन करण्यात आले .प्रात:स्मरण , मानसपूजा, 108 वेळा अनुग्रह मंत्राच्या जपाने विभूती अभिषेक, मंगलगाथाचे, समाधीला गंगोदकाने सिंचन व शिष्यांनी पारिसवर गुरू मंत्राचे नामस्मरण करत उगाळून तयार केलेल्या चंदनाचे लेपन व विभुती अभिषेक करण्यात आला. नारायण पूजन नागपूर येथून आलेले दिलीप व सौ प्रतिमा रोडी यांच्या हस्ते झाले .असंख्य शिष्य आणि नाथ भक्तांच्या सहभागाने महाआरती संपन्न झाली. मिटमिटा परिसरातील असंख्य भाविक भक्तांनी दर्शन घेऊन कृपाशिर्वाद व महाप्रसादाचा लाभ घेतला . यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये 15 जणांनी रक्तदान केले . गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वावर नियोजित परम पूज्य सद्गुरु श्री मंगलनाथ महाराजांच्या मंदिराचे भूमिपूजन संपन्न झाले. सुप्रसिद्ध कीर्तनकार डॉ श्री प्रसाद भंडारी यांचे कीर्तन झाले.अमरावती येथील श्री नरेंद्र केवले यांनी " परम पूज्य सद्गुरु श्री मंगलनाथ महाराज यांचेअलौकिक आध्यात्मिक जिवन व त्यांचे लोकोत्तर कार्य "या विषयावर अतिशय सुंदर , भावपूर्ण प्रवचन झाले. मिटमिटा येथील शाळेतील विद्यार्थ्यांना , गुरूमाता पूज्य सौ माधवीताई माधवराव रत्नपारखी यांच्या स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री वेदांत रत्नपारखी यांच्या वतीने संगीत वाद्य वही, पेन याचे वाटप करण्यात आले. तसेच शाळेतील दहावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शाल आणि ध्यानाचा ओम ( momento) देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. मुंबई, नागपूर, बंगलोर अमरावती,अकोला, पुणे, जळगाव, नाशिक, रावेर आदी ठिकाणाहून बरीच शिष्य मंडळी या कार्यक्रमा साठी आली होती. याप्रसंगी चंद्रकांतजी खैरे,माजी महापौर नंदकुमारजी घोडेले, नगरसेवक किरण मानकापे,श्रीशंकर अण्णा मात्रे , जालिंदर शेंडगे, विजय वाघचौरे, जगन्नाथ काळे यांनीही दर्शन घेतले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात,'गुरुपौर्णिमा' उत्साहात साजरी..



**शिरूर कासार (प्रतिनिधी)** बुधवार रोजी, कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिरूर(का.) जि.बीड येथे 'गुरुपौर्णिमा' मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य केशव भांगे साहेब यांच्या हस्ते, आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापिका लोकनेत्या स्व. केशरबाई (काकू) क्षीरसागर व लोकनेते स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे गुरुवंदन केले.

याप्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी आपल्या भाषणातून 'गुरुपौर्णिमेला' मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे.

गुरु म्हणजे ज्ञानाची व जीवनाची नवी दिशा असते. गुरु म्हणजे अंधारातला प्रकाश असतो.गुरुने दिलेल्या ज्ञान, संस्कार व मार्गदर्शनातूनच जीवनाचे परिवर्तन होत असते. कारण योग्य वेळी मिळालेला गुरूंचा एक सल्ला आचरणात आणला की, आयुष्याची दिशा आणि दशा दोन्ही बदलतात. तेव्हा गुरु हेच ज्ञानाचे दीपस्तंभ असतात. असे त्यांनी गुरूंचे महात्मे आपल्या भाषणातून वर्णन केले आणि सर्व गुरुजनांना शुभेच्छा दिल्या. तसेच कु.श्रावणी मोरे, समृद्धी तुपे, आर्या ढाकणे, सोनाली भुजबळ चि,आदित्य मोरे,राज कांबळे यांनी आपल्या मनोगतातून गुरुजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्यध्यापक श्रीसिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक श्रीजनार्दन काळे, विज्ञान प्रमुख प्रा.संजय काकडे,प्रा.नामदेव तरकसे,प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा. अशोक इनकर, प्रा. प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभीषण घायाळ, प्रा. महादेव हंगे, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण घोलप, प्रा.नारायण तांबे, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा. घनश्याम चव्हाण, प्रा. लक्ष्मण गव्हाणे, प्रा. सुनील मोरे, प्रा. अशोक सवासे, प्रा. दत्ता शिंदे, प्रा. रवींद्र संकपाळे, प्रा. शशिकांत जावळे, प्रा. हनुमंत घायाळ, प्रा. बाळासाहेब खटाणे प्रा. सविता दराडे प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सीमा ढवळे,श्रीमती अनिता लाटे, श्री रविंद्र बडे, आप्पासाहेब कांबळे,राजू बडे, विनायक सुरवसे,रवी जोशी, नितीन बहिर, रवींद्र गव्हाणे, आदिनाथ काशीद, सुनील खेडकर,विलास कांबळे, गौतम भोसले इत्यादींची उपस्थिती होती.

'गुरुपौर्णिमा' कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाचे प्रा.विनोद गलांडे व श्रीजयेंद्र निकम यांनी केले होते.

तर सूत्रसंचालन कु. आराध्या गित्ते व आभार प्रदर्शन कु. हर्षदा सकुंडे यांनी केले. यावेळी विद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हंडी येथे शिष्यवृत्ती परीक्षा पात्र विद्यार्थ्यांसह पालकांचा सत्कार




**जिंतूर : (बी.डी.रामपूरकर)** शिष्यवृत्ती परीक्षेत शाळेतील कल्याणी (२२० गुण), अश्विनी (२०६ गुण), सम्राट राठोड (१९४ गुण) , कार्तिक गंगाधर (१८४ गुण), श्रेणी–4, कौस्तुभ राठोड (१७२ गुण) व विश्वराज पवार (१७२ गुण), तसेच कार्तिक डोईफोडे (१६६ गुण), यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाळेच्या वतीने पुष्पहार घालून गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर यश संपादन करावे, असे आवाहन करण्यात आले.